तरुण भारत
Akola Main | 2024-08-14 | Page- 7
epaper.tarunbharat.net

# घोटा येथे सायबर सुरक्षेविषयी मार्गदर्शन

**अकोला, १३ ऑगस्ट**

स्थानिक बाबासाहेब धाबेकर विद्यालय येथे सायबर सुरक्षाबाबत मार्गदर्शन झाले. यामध्ये सायबर क्राईम आणि त्याचे प्रकार, सोशल मीडियाच्या माध्यमातून ऑनलाईन गुन्हे कसे घडतात, इंटरनेट आणि मोबाईलच्या माध्यमातून होणारे फ्रॉड्स, तसेच अशी ऑनलाईन फसवणूक होऊ नये म्हणून कोणती काळजी घ्यावी याविषयी माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देऊन मोबाईलचा योग्य आणि कमीत कमी वापर करण्यासाठी शपथ देण्यात आली. ही कार्यशाळा शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाच्या सहकायनि व क्विक हिल फाउंडेशन, पुणे आणि महाराष्ट्र सायबर सेल, मुंबई यांच्या सहयोगाने प्राचार्य डॉ. जे. एम. साबू आणि उपक्रमाचे समन्वयक डॉ. एच. जे. खरात यांच्या मार्गदर्शनात आयोजित केली होती.

यामध्ये सायबर वॉरियर्स सार्थक ठाकरे व सक्षम लोडम यांनी मार्गदर्शन केले.यावेळी प्राचार्य पी.बी. गवळी व शिक्षक, शिक्षकेतकर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. *(तभा वृत्तसेवा)*

Powered by iDocuments